# आंतरिक प्रकाशच बाह्य प्रकाश आहे

१ जुलै, २०२५

आत्मीय वाचक,

शुभ गुरुपौर्णिमा महिना!

समयाच्या अगणित उपहारांपैकी एक उपहार नक्कीच हा असावा की, जून महिन्यानंतर जुलै येतो. इथे, श्री मुक्तानंद आश्रमात ग्रीष्म ऋतू त्याच्या चरम शिखरावर पोहोचतो आहे, तेव्हा निदान या समयी माझा तरी हा निष्कर्ष आहे. अगदी अलीकडेच श्रीगुरुमाईंच्या जन्मदिनाच्या महिन्याचा सोहळा आपण साजरा केला आहे. सद्गुणांचे अध्ययन व त्यांचा अभ्यास आपण केला आहे. आपण ‘सिंहपर्णी’च्या खऱ्याखुऱ्या तसेच काल्पनिक फुलांद्वारे शांतीची कामना केली आहे. आपण याचे चिंतनमनन करत आलो आहोत की, आपल्या विचारांमध्ये, शब्दांमध्ये आणि कृतींमध्ये ‘स्पष्टता’ प्रकट करणे याचा अर्थ काय असतो.

मला माझ्या श्रीगुरूंचे गुणगान करणे, त्यांचे पूजनवंदन करणे अतिशय आवडते. मला जर शक्य झाले असते, तर कदाचित मी तो उत्सव तुमच्यासोबत पुढील महिन्यात, त्याच्या पुढील महिन्यात व त्याच्याही पुढील महिन्यात साजरा करत राहिले असते. एका अर्थाने, माझी इच्छा तशी पूर्णदेखील झाली आहे. कारण जून महिन्यानंतर जुलै येतो—आणि जुलैमध्ये [किंवा, आणखी अधिक स्पष्टपणे सांगायचे झाल्यास भारतीय पंचांगानुसार आषाढ महिन्यात, जो बरेचदा जुलै महिन्यात येतो], आपण गुरुपौर्णिमा साजरी करतो.

या वर्षी गुरुपौर्णिमा १० जुलै रोजी आहे. या दिवशी चंद्राच्या कला पूर्णत्वाला पोहोचलेल्या असतील आणि त्याची हीच परिपूर्णता, संपूर्णता व त्याचे तेज हे गुरू-शिष्य संबंधाचे द्योतक आहे. गुरुपौर्णिमा या उत्सवाचा प्रारंभ प्राचीन भारतात झाला आणि हा उत्सव मला नेहमीच आकृष्ट करतो. याचे एक कारण असे आहे की, या उत्सवाची सुरुवात शिष्यगणांनी केलेली आहे. श्रीगुरूंविषयी असलेल्या शिष्यांच्या प्रेमामुळे, श्रीगुरूंनी त्यांच्या शिष्यांना जे काही प्रदान केले होते त्याविषयी आदर व्यक्त करण्यासाठी आणि श्रीगुरूंकडून प्राप्त झालेल्या या आशीर्वादांकरिता कृतज्ञता प्रकट करण्याच्या उद्देशानेच गुरुपूजनाचा हा वार्षिक उत्सव साजरा केला जाऊ लागला.

आज, युगानुयुगे लोटल्यानंतर, जेव्हा आपण सिद्धयोग मार्गावर गुरुपौर्णिमेचा सोहळा साजरा करण्याची तयारी करत आहोत, तेव्हा माझ्या मनात हा विचार येतो की, आजच्या काळात शिष्य असणे याचा अर्थ काय आहे. निश्चितच, ज्याप्रमाणे श्रीगुरूंनी प्रदान केलेले ज्ञान हे समयातीत आहे, त्याचप्रमाणे गुरू-शिष्य संबंधाचे सारदेखील अपरिवर्तनीय आहे. आणि, या जगात जीवन हे आव्हानांनी भरलेले आहे यात नवीन असे काहीच नाही. 'पूर्वीचा तो सुवर्णकाळ,' जो आठवण्याचा मोह आपल्याला कधीकधी होतो, तो दहा, वीस अथवा पन्नास वर्षांपूर्वी जरी होऊन गेला असला, तरी तो काळ कदाचित आपल्या आठवणीतल्या दिवसांपेक्षाही अधिक कठीण आणि अडचणींनी भरलेला होता. सरतेशेवटी, माणसाचा स्वभाव हा नेहमीच एकसारखा राहिला आहे—आणि तो म्हणजे, आपल्यामध्ये चांगुलपणाची अमर्याद क्षमता आहे व त्याचबरोबर या चांगुलपणाच्या गुणापासून फार पटकन भरकटून दूर जाण्याची दुर्बलतादेखील आहे.

आपण ज्या काळात राहत आहोत, त्याचे वैशिष्ट्य हे आहे की, ज्या साधनांनी आपण स्वतःला विचलित किंवा भ्रमित करू शकतो, त्या साधनांची संख्या आणि गुंतागुंत या दोहोंमध्ये वाढ झाली आहे. अनेक प्रकारांनी आपली एकाग्रता कमी झाली आहे—किंवा किमान इतके तर नक्कीच आहे की, आपली एकाग्रता अतिशय सहजतेने भंग पावते. आणि जेव्हा आपली सामूहिक एकाग्रता अशा प्रकारे विखुरते, तेव्हा या विखुरण्यामुळे केवळ विभाजनच होते असे नाही, तर कलहदेखील निर्माण होतो. प्रत्येकजण जेव्हा वेगवेगळ्या गोष्टी बोलत असतो, वेगवेगळ्या गोष्टी ऐकत असतो आणि वेगवेगळ्या गोष्टींसाठी अट्टहास करत असतो, तेव्हा एकजुटीने राहणे कठीण होते.

या दृष्टिकोणातून पाहिल्यास, मला अधिकच जागरूकतेसह या गोष्टीची जाणीव होते—आणि मला विश्वास आहे की, तुमच्यापैकी अनेक लोकांनाही अशी जाणीव होत असेल—की श्रीगुरूंनी दर्शवलेल्या मार्गावर वाटचाल करणे हे आपले सद्‌भाग्यही आहे आणि आपले उत्तरदायित्वदेखील आहे. आणि मला अगदी हृदयापासून या गोष्टीसाठी प्रगाढ कृतज्ञता जाणवते की, माझ्या जीवनात *श्रीगुरू आहेत*—भाग्याचा आणि सत्कर्मांचा काय तो योग होता कुणास ठाऊक, तसेच सिद्धयोग मार्गाचे अनुसरण करण्याची माझ्या कुटुंबापाशी अशी कोणती दूरदृष्टी होती, की जी मला इथे, माझ्या श्रीगुरूंच्या चरणी घेऊन आली आहे.

या वर्षी, २०२५मध्ये, श्रीगुरुमाईंनी आपल्याला नववर्ष-संदेश प्रदान केला आहे : *तुमचा वेळ हा तुमच्यासाठी लाभप्रद बनवा.* मी जेव्हा या गोष्टीवर विचार करते की, शिष्यत्वाचे मूर्तरूप बनणे याचा अर्थ काय आहे आणि गुरुपौर्णिमेच्या या महिन्यात मी माझ्या श्रीगुरूंचा सन्मान सर्वोत्तम रीतीने कशा

प्रकारे करावा, तेव्हा माझ्यात हा संकल्प दृढ होतो की, श्रीगुरुमाईंनी मला जे काही दिले आहे, ते मी माझ्या जीवनात पूर्णपणे कार्यान्वित करावे. श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाचे पालन करून मी त्या शक्तीचे पोषण करू इच्छिते, जी त्यांनी माझ्या अंतरी जागृत केली आहे.

हे कृतीत आणण्यासाठी मी योजलेला एक मार्ग म्हणजे ‘श्रीगुरुवचन’ पुन्हा वाचणे. ‘श्रीगुरुवचन’मध्ये गुरुमाईंच्या त्या नऊ शिकवणींचा समावेश आहे, ज्या त्यांनी दोन वर्षांपूर्वी गुरुपौर्णिमेच्या प्रसंगी प्रदान केल्या होत्या. यांपैकी प्रत्येक शिकवणीत गुरुमाईंनी असे विशिष्ट कार्य करण्याविषयी सांगितले आहे, की ज्याच्याद्वारे आपण आपल्या समयाचा सर्वोत्कृष्टपणे उपयोग करू शकतो. सिद्धयोग मार्गावर आपण जे अभ्यास करतो, त्या सर्व अभ्यासांप्रमाणेच याचे प्रभावदेखील संचित होत जातात आणि ते सर्वव्यापी असतात. आपण जेव्हा समयाशी असलेल्या आपल्या नात्यात बदल करतो व त्यात सुधारणा करतो, तेव्हा असे केल्याने त्याच्याच अनुरूप, आपल्या सभोवतालच्या लोकांशी व जगाशी असलेल्या आपल्या नात्यांमध्ये बदल घडू लागतो. आपल्याला एक प्रकारचा फरक दिसतो आणि तो फरक इतरांनादेखील दिसतो.

***

मी जेव्हा गुरुपौर्णिमेविषयी विचार करते आणि एक सिद्धयोगी म्हणून माझ्यासाठी गुरुपौर्णिमेचे महत्त्व काय आहे याविषयी विचार करते, तेव्हा असा एक क्षण येतो, जेव्हा असे वाटते की जणू माझे मन स्वतःमध्येच अडखळते आहे. विचार आणि भाषा विलीन होतात आणि अंतरी एक आत्यंतिक भावना उचंबळून येते—ती केवळ एक जाणीवच नसते, तर त्याहूनही कितीतरी अधिक असते. ते प्रेम असते. तो आदरयुक्त श्रद्धाभाव असतो. ती कृतज्ञता असते. ते या सर्व गोष्टींचे एक अद्‌भुत मिश्रण असते.

शिष्य असण्याचा एक भाग म्हणजे, आपण ही भावना अभिव्यक्त करावी. तुम्ही या विचाराशी सहमत आहात ना? आणि ही भावना आपण केवळ यासाठी अभिव्यक्त करू नये, की हा एक नेमून दिलेला अभ्यास आहे; किंवा यासाठीही करू नये की, असे करणे उचित आहे. आपण ही भावना अभिव्यक्त करावी, कारण ती हृदयाचे स्फुरण आहे, हृदयाची साद आहे. आणि हे प्रेम, ही भक्ती जेव्हा अंतरातून ओसंडून वाहतात, तेव्हा त्यांना एक गंतव्यस्थान हवे असते.

मी यापूर्वीही लिहिले आहे की, भगवंत, श्रीगुरू आणि आत्मा हे एकच आहेत ही सिद्धयोगाची शिकवण मला मोहून टाकते. ही ती शिकवण आहे जिच्यावर मी गुरुपौर्णिमेच्या सुमारास अनेकदा चिंतन करते. हा सोहळा श्रीगुरू आणि गुरुशक्ती यांचा सन्मान करण्यासाठी समर्पित आहे. एकीकडे, माझा या

गोष्टीवर विश्वासच बसत नाही की, माझे इतके सद्भाग्य आहे की, मला एका सद्गुरूंचे दर्शन व शिकवणी प्राप्त होत आहेत. ही गोष्ट माझ्यासाठी सदैव विस्मयकारकच राहील. आणि दुसरीकडे, ही जगातील सगळ्यात स्वाभाविक गोष्ट आहे! कितीतरी वेळा मला जाणवते की, गुरुमाई माझ्या इतक्या निकट आहेत, जितके निकट माझे स्वतःचे हृदय आहे.

एकत्वाच्या या ओझरत्या अनुभूती इतक्या अद्भुत जरी असल्या, तरी मला असे आढळून येते की, तुकाराम महाराजांसारखे भारताचे महान संतकवी जे म्हणत असत, तसे मलादेखील जाणवते. आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतरही हे संतजन त्यांच्या इष्टदेवतेला प्रार्थना करून अशी मागणी करत असत की, त्यांच्या अंतरी इष्टदेवतेपासून पृथक असल्याचा थोडासा तरी भाव असू द्यावा. त्यांची अशी मनोकामना असे की, त्यांना त्यांच्या प्रिय भगवंताची आराधना निरंतर करत राहता यावी; ते शिष्यत्वाचा सक्रिय भाव टिकवून ठेऊ इच्छित होते.

तेव्हा, मुद्दा जेव्हा त्या प्रश्नाविषयी येतो, जो प्रश्न मी या पूर्ण पत्रात विचारत आले आहे, की शिष्य असणे याचा अर्थ काय आहे आणि गुरुपौर्णिमेच्या समयी श्रीगुरूंचा सन्मान सर्वोत्कृष्ट पद्धतीने कसा करावा, तर त्याची अनेक उत्तरे आहेत. श्रीगुरूंच्या शिकवणी आचरणात आणण्याविषयी मी तुमच्याशी बोलले आहे आणि याविषयीदेखील बोलले आहे की, आपण जेव्हा श्रीगुरूंच्या शब्दांचे पालन करतो, तेव्हा आपण प्रत्यक्षपणे या गोष्टीला मान्यता देत असतो की ते शब्द आपल्यासाठी अनमोल आहेत. याबरोबरच, आपण श्रीगुरुपूजेचा अभ्यासदेखील करू शकतो. आपण वेळ निश्चित करून श्रीगुरूंच्या नामाचे संकीर्तन करू शकतो, श्रीगुरूंचे ध्यान करू शकतो आणि श्रीगुरूंच्या दर्शनाचे आपल्याला आलेले अनुभव जर्नलमध्ये लिहू शकतो. आणि मला खात्री आहे की, जे करण्याची योजना तुमच्यापैकी अनेकजणांनी आखण्यास आधीच सुरुवात केली आहे, ते आपण करू शकतो : आपण गुरुदक्षिणेच्या अभ्यासात सहभागी होऊ शकतो.

***

गुरुपौर्णिमेच्या महिन्यात आपण सिद्धयोग परंपरेच्या तिन्ही गुरूंचे पूजनवंदन करतो : श्रीगुरुमाईंचे, बाबा मुक्तानंदांचे [जे गुरुमाईंचे श्रीगुरू होते], आणि भगवान नित्यानंदांचे पूजनवंदन [जे बाबांचे श्रीगुरू होते]. या कारणास्तव, हे सर्वथा उपयुक्त वाटते, उचित वाटते की, २१ जुलै [भारततात, २२ जुलै] रोजी आपण श्रीगुरूंच्या सन्मानार्थ आणखी एक सोहळा साजरा करणार आहोत. आणि तो म्हणजे, चांद्रतिथीनुसार भगवान नित्यानंदांची पुण्यतिथी.

बडे बाबांची पुण्यतिथी तो दिवस आहे, ज्या दिवशी ते त्यांच्या भौतिक देहाचा त्याग करून त्या परमचेतनेत लीन झाले, ज्या चेतनेने हे अखिल जगत बनलेले आहे. हा प्रसंग आपल्याला स्मरण करवतो की, बडे बाबांनी एक प्रकारे या जगताचा त्याग जरी केला असला, तरी ते त्यांच्या संपूर्ण शक्तिनिशी इथे पूर्णतः विद्यमानदेखील आहेत. वातावरणाच्या कणाकणात त्यांच्या कृपेची अनुभूती अगदी स्पष्टपणे होते.

त्यांच्या चांद्र पुण्यतिथीला चंद्राची कला म्हणजे एक चंद्रकोर असेल, प्रकाशाच्या अगदी त्या कोरीसारखी असेल, जी भगवान शिवाच्या जटांमध्ये सुशोभित असते. मला हे प्रतीक अत्यंत सुंदर वाटते! ज्या पूर्ण चंद्राचे दर्शन आपण या महिन्याच्या आरंभी केलेले असेल, तो बडे बाबांच्या पुण्यतिथीच्या वेळी त्याच्या मखमली श्यामवर्णी आवरणामागे निश्चित असेल. आपल्याला त्याचे पूर्ण रूप जरी दिसले नाही, तरी त्याच्या प्रकाशाचे दर्शन आपण निश्चितच करू शकतो.

*भगवंत, श्रीगुरू आणि आत्मा हे एकच आहेत.* आंतरिक प्रकाशच बाह्य प्रकाश आहे. पृथकत्व हे मुळी नाहीच, मग भलेही कधीकधी पृथकत्व असल्यासारखे भासत असेल आणि आपण भलेही त्या पृथकत्वाच्या भावनेचे *रसास्वादन करत असू,* कारण या पृथकत्वाच्या भावनेमुळे आपला भक्तिभाव अधिक पूर्णपणे अभिव्यक्त होऊ शकतो. हा एक रहस्यमय दृष्टिकोण आहे, होय ना? हे गूढ तत्त्वज्ञान आहे. आणि सिद्धयोग मार्गावर आपण साजरा करत असलेल्या प्रत्येक सोहळ्यागणिक, भगवंताचे स्मरण करण्यासाठी, त्याचा अनुभव घेण्यासाठी आपल्याला मिळालेल्या प्रत्येक संधीगणिक आपण ज्याकडे परत येतो, ते सत्यदेखील हेच आहे.

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.